प्रेसनोट

जा.क्र.८०६/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०८/१२/२०१७

## " हलबा समाज मोर्चा "

भंडारा:– जिल्हयात पोलीस स्टेशन भंडारा अंर्तगत आदीवासी हलबा समाज, भंडाराचे वतीने आदिवासी समाज बांधव व कर्मचाऱ्यावर शासनामार्फत होत असलेल्या अन्यायाच्या विरोधात व आपले संविधान अधिकार प्राप्त करून घेण्यासाठी व शासनाचे लक्ष वेधण्यासाठी धंनजय दलाल माजी अध्यक्ष, हातमाग महामंडळ याचे प्रमुख उपस्थितीत व आयोजक श्री अनिल रामदचंद्र धकाते, कार्याअध्यक्ष आदीवासी हलबा समाज भंडारा जिल्हा श्री मनोहर हेडावु अध्यक्ष आदीम कृती समीती भंडारा श्री नीतीन धकाते,नगर सेवक भंडारा, श्री दुर्वासजी हलबा महासंघ यांचे नेतृत्वात दिनांक ९/१२/२०१७ रोजी दुपरी १३.०० वाजता आयोजित करण्यात आलेला आहे.

सदर मोर्चा चांदणी चौक भंडारा येथुन निघुन आंबेडकर वार्ड –पोलीस स्टेशन च्या मागेहुन गांधी चौक गांधी चौक मेन रोड बस स्टॉप, त्रिमुर्ती चौक भंडारा येथे पोहचुन सभेत रूपांतर होणार आहे. सदर मोर्च्यात अंदाजे ४,५०० ते ५००० आदीवासी हलबा समाजाचे महिला व पुरूष सहभागी होणार असल्याचे वर्तविली आहे.

त्यांचे वर्तनावर, वागणुकिवर, नियंत्रण ठेवणे, व कृतीवर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. कार्यक्रमाची व मिरवणुकिची वेळ मार्ग ठरवीने आवश्यक आहे. संभाव्य कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न प्रश्न निर्माण होवुन नये म्हणुन प्रतिबंध घालुन सदर मोर्चा दरम्यान शातंता व सुव्यवस्था ठेवणे आवश्यक आहे.

उपरोक्त मोर्चा हा त्रिमुर्ती चौक भंडारा येथे पोहचल्या नंतर त्रिमुर्ती चौकामध्ये गर्दी होवुन वाहतुकीस अडथळा निर्माण होण्याची शक्यता असल्याने खालील प्रमाणे रोड बंद करण्याची व वाहतुक (एस.टी) बसेस वळविण्या करीता उपाय योजना करण्यात आली आहे.

त्याअर्थी मी,विनीता साहू, पोलीस अधीक्षक, भंडारा कलम ३४ मुबंई पोलीस कायदा १९५१ अन्वयेमला प्राप्त झालेल्या अधीकाराचा वापर करून याद्वारे यथा योग्य आदेश देण्याचे अधिकार भंडारा जिल्हयातील सर्व ठाणेदार व त्यावरील वरिष्ठ दर्जाच्या पोलीस अधीकाऱ्यांना आदेश निर्गतीत करण्यास अधिकार प्रधान करीत आहे.

१) त्रिमुर्ती चौक ते बसस्थानक पर्यत रोड बंद करणे.

२) त्रिमुर्ती चौक ते मुस्लीम लायब्ररी चौक पर्यत बंद करणे.

३) भंडारा बसस्थानक येथुन साकोली कडे जाणारे एस.टी.बसेस सामान्य रूग्नालय रोड ते एस.टी डेपो ते अशोका बार समोरून राष्ट्रीय महामार्ग पर्यत जातील.

४) नागपुर कडुन भंडारा बसस्थानकाकडे येणाऱ्या बसेस राष्ट्रीय महामार्ग – जिप चौक ते साईमंदीर रोड ते राजीव गांधी चौक ते मुस्लीम लायब्ररी चौक ते पोस्ट ऑफीस चौक ते बसस्थानक पर्यत.

सदर अधीसुचना दि. ०९/१२/२०१७ चे सकाळी १०.०० वा. ते २०.०० वाजता पर्यंत अमलात राहील.

सदर आदेश माझे सही शिक्यानीशी आज दि.०८/१२/२०१७ रोजी अधीसुचना निर्गमित करण्यात आली आहे. (सदरची माहीती उदया दि.९/१२/२०१७ ला वृत्त पत्राात देण्यास विनंती आहे.)

**(मपोउपनी. प्रणती लांजेवार)**
**माहिति कक्ष भंडारा**
**दुरध्वनी.क्र. ८८०५६५७६२**

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.